अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती.

# NOTICE

Tuljaram Chaturchand College Baramati

Displayed on- 27/09/2022 Notice No. 322

## कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील एस.सी.जात संवर्गातील विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिप फॉर्म भरणेसाठी अत्यंत महत्वाची सूचना:—

शैक्षणिक वर्ष २०२२—२३ मधील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील एस.सी. कॅटेगरीतील विद्यार्थ्यांचे महाडीबीटी पोर्टलवर स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरणेसाठी वेबसाइट दि.२२/०९/२०२२ पासून सुरु झालेली आहे. तरी, विद्यार्थ्यांनी **www.mahadbtmahait.gov.in** या दिलेल्या संकेतस्थळावर आपले शिष्यवृत्तीचे ऑनलाईन फॉर्म भरावेत.

## ऑनलाईन फॉर्म भरणेकरीता खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

१. विद्यार्थ्याचा स्वत: च्या नावाचा जातीचा दाखला.

२. सन २०२१—२२ मधील तहसिलदारांचा वडीलांचेनावे उत्पन्नाचा दाखला असने आवश्यक आहे. स्कॉलरशिपसाठी उत्पन्नाची मर्यादा रु. २,५०,०००/— (दोन लाख पन्नास हजार एवढी आहे.)

३. वडील हयात नसतील तर आईचा उत्पन्नाचा दाखला व सोबत वडिलांच्या मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स जोडावी.

४. आधारकार्ड बॅकखाते व मोबाईल नंबरशी संलग्न असणे आवश्यक आहे.

५. मागील वर्षीचे मूळ गुणपत्रकाची झेरॉक्स आपलोड करणे आवश्यक आहे. ऑनलाईन मार्कशीट अपलोड करु नये अन्यथा फॉर्म रिजेक्ट हाईल.

६. गॅप असेल तर गॅप ॲफिडेव्हीट अपलोड करणे आवश्यक आहे.

७. डोमासाईल सर्टिफिकेट अपलोड करणे आवश्यक आहे.

८. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स व पी.जी. साठी टी.सी. जोडावा.

९. शैक्षणिक वर्ष २०२२—२३ चे प्रवेश फी चलन अपलोड करावे.

१०. महाडीबीटीवरील ऑनलाईन प्रतिज्ञापत्र अपलोड करणे आवश्यक आहे.

११. महाराष्ट्र शासन निर्णय क्र. भासशि—२०२२/प्र.क्र.७४/ शिक्षण— १ नुसार महाविद्यालयास देय असलेले शिक्षणशुल्क, परीक्षा शुल्क, इतर शुल्क व निर्वाहभत्ता इत्यादी रक्कम थेट केंद्र शासनाकडून विद्यार्थ्यांच्या संलग्नीकृत बॅक खात्यात जमा होणार आहे. यापैकी निर्वाहभत्ता व परीक्षाशुल्क वजा जाता महाविद्यालयास देय असलेली ६० टक्के रक्कम विद्यार्थ्यांच्या बॅक खात्यामध्ये जमा झाल्यानंतर महाविद्यालयास सात दिवसाच्या आत अनिवार्यत: भरावी लागणार आहे. याची स्कॉलरशीपच्या विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. सदरचा नियम एस.सी. फ्रिशिपच्या विद्यार्थ्यांसाठी नाही.

# एस.सी. कॅटेगरीतील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती फॉर्म कसा भरावा याबाबत महत्वाची सूचना

१. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना करंट डिटेलस् या कॉलममध्ये फी पेड झिरो (शून्य) टाकणे अनिवार्य आहे. अन्यथा रक्कम टाकल्यानंतर कॉलेजने दिलेली फी सवलतीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा होईल व विद्यार्थ्यास पुन्हा महाविद्यालयाकडे रक्कम भरावी लागेल याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

२. स्कॉलरशिप फॉर्म भरताना करंट डिटेलस् या कॉलममध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्रँट मध्ये असेल तर **Aided** टाकावे व नॉनग्रँटमध्ये प्रवेश असेल तर **UnAided** असे टाकावे.तसेच कॉलेजचे नाव बरोबर सिलेक्ट करावे.

३. विद्यार्थ्यांना एकावेळी एकाच शिष्यवृत्ती योजनेचा फॉर्म भरावा. जर एखाद्या विद्यार्थ्याने कोणत्याही दोन योजनेचे फॉर्म भरल्यास एक योजना रिजेक्ट होते व यामध्ये कॅटेगरीतील विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होते. यासाठी विद्यार्थ्यांनी शक्यतो महाडीबीटी वरील पोस्ट मॅट्रीक स्कॉलरशीपचाच फॉर्म भरावा व एकाच योजनेसाठी अर्ज करावा.

४. विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरताना खाली दिल्याप्रमाणे महाविद्यालयाचे नाव निवडावे/सिलेक्ट करावे.

**Senior College - Tuljaram Chaturchand College (0)**
**Junior College - Tuljaram Chaturchand College (27250211827)**

**Vocational (Jr.College) - MCVC ANEKANT EDUCATION SOCIETY'S TULJARAM CHATURCHAND COLLEGE (2765211090)**

महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी फॉर्मची प्रिंट व वरील कागदपत्रे स्वत:जवळ ठेवावीत. विद्यार्थ्यांनी हार्ड कॉपी महाविद्यालयामध्ये जमा करण्याची गरज नाही. ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश हा फी सवलतीत झालेला आहे अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्कॉलरशिप/फ्रिशिपचा फॉर्म भरला नाही तर संबंधित विद्यार्थ्यांच्या होणा–या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील व महाविद्यालयाची उर्वरित फी भरावी लागेल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

Tuljaram Chaturchand College Baramati

प्राचार्य